# प्रात्यक्षिक ३. संदर्भ सेवा

ग्रंथपाल हा माहिती स्रोत आणि वाचक यांच्यामधील दुवा समजला जातो. वाचकांना आवश्यक ती अद्ययावत माहिती अत्यल्प वेळात प्राप्त करून देणे हे ग्रंथपालाचे सर्वात महत्वाचे कार्य आहे. त्यासाठी ग्रंथपाल ग्रंथालयीन वाचनसंग्रह आणि संदर्भ साधने यांच्या साहाय्याने वाचकांना हवी असलेली माहिती देण्याचे कार्य करत असतो. संदर्भ साधनांमध्ये प्रामुख्याने शब्दकोश, विश्वकोश, निर्देशिका, विविध विषयांचा ग्रंथसंग्रह, नियतकालिके, विविध उपलब्ध इ-स्रोत इत्यादींचा समावेश होतो. वाचकांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे आणि त्यांना अपेक्षित असलेली माहिती या सर्व संदर्भ साधनांच्या साहाय्याने देण्याचा प्रयत्न केला जातो. ह्यालाच संदर्भ सेवा असे म्हणतात. या प्रात्यक्षिकामध्ये आपल्या सरावासाठी संदर्भ सेवेवर आधारित प्रश्न दिलेले आहेत त्यांची उत्तरे ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या संदर्भ साहित्याच्या साहाय्याने शोधून काढा आणि शोधल्यानंतर संबंधित संदर्भ ग्रंथाची नोंद करा.

**स्वाध्याय :**

(१) खालील इंग्रजी शब्दांचे अर्थ शोधून काढा.
- (अ) Moratorium
- (आ) Publicist
- (इ) Resonance
- (ई) Salvation
- (उ) Theosophy

(२) भारतीय सणांची माहिती मिळवा.
- (अ) होळी
- (आ) गुढीपाडवा
- (इ) दसरा
- (ई) रक्षाबंधन

(३) खालील विषयांवर माहिती मिळवा
- (अ) भारतीय अर्थव्यवस्था
- (आ) महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती
- (इ) अध्यापन पद्धती

(४) मेरीअम वेबस्टर शब्दकोशाचा (Merriam-Webster Dictionary) वापर करून "Encyclopedia" ह्या संज्ञेची व्याख्या शोधा.

(५) डॉ.शियाली रामामृत रंगनाथन यांची माहिती शोधा.

(६) मराठी कथाकार द.मा.मिरासदार यांची माहिती शोधा.

(७) विनोदी लेखक पु.ल.देशपांडे यांची माहिती शोधा.

(८) दासबोध ह्या ग्रंथावर माहिती शोधा.

(९) रामधारी सिंह दिनकर ह्या हिंदी साहित्यिकाची माहिती शोधा.

(१०) एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या खालील संकेत स्थळावर जाऊन खालील संज्ञा शोधा.

https://www.britannica.com/search?query=nano+technology
- (अ) Nano technology
- (आ) Cloud computing
- (इ) Heat and thermodynamics
- (ई) Biotechnology
- (उ) Cytology
- (ऊ) Genetic engineering
- (ए) Bio sociology

(११) खालील नियतकालिकांची माहिती इंटरनेटचा वापर करून शोधा.
- (अ) Nature
- (आ) Decision
- (इ) EPW
- (ई) Library Herald
- (उ) The Lancet